# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक १९६७, मुंबई ४०० ००१.

दूरध्वनी - २२६२०६०१, २२६९०६०२, २२६४११५०/५१, फॅक्स - २२६९२१०२.

तार - EDUTECH E-mail : Desk2@dte.org.in Internet : http://www.dte.org.in


क्रमांक :२/एनजीपी/२००३/ ७६८१

दिनांक : 10 सितम्बर SEP 2003

प्रति

प्राचार्य,

जैन विद्या प्रसारक मंडळाचे,

श्री फत्तेचंद कॉलेज ऑफ फार्मसी,

टेल्को रोड, डी. ११, ६०-६१, चिंचवड पुणे १९.

**विषयः-** **शैक्षणिक वर्ष २००३-०४ साठी विना अनुदान तत्वावर औषधनिर्माणशास्त्र हा पदविका अभ्यासक्रम सुरु करण्यास परवानगी देण्याबाबत...**

संदर्भः- शासन निर्णय, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, क्रमांकः मान्यता २००३/(१४९/०३)/आयव्ही/तांशि-२, दिनांक ११.०८.२००३

उपरोक्त विषयासंदर्भात आपणांस कळविण्यात येते की, शासनाने वरील संदर्भाधीन शासन निर्णयान्वये आपल्या संस्थेला शैक्षणिक वर्ष २००३-२००४ साठी विना अनुदान तत्वावर खालील पदविका अभ्यासक्रम त्यांच्यासमोर दर्शविलेल्या प्रवेशक्षमतेसह सुरु करण्यास विहित अटींच्या अधिन राहून परवानगी दिलेली आहे.

| अ.क्र. | अभ्यासक्रम | प्रवेशक्षमता |
|---|---|---|
| १ | औषधनिर्माणशास्त्र पदविका | ६० |

सदर अटींपैकी आपण शासन निर्णयात नमूद केलेल्या अटीचे पालन करण्याचे नोंदणकृत हमीपत्र या संचालनालयास सादर करावे लागेल तसेच संस्थाचालक व संबंधित सहसंचालक यांच्या संयुक्त खात्यात शासन जी रक्कम विहीत करेल ती भरणे संस्थेवर बंधनकारक आहे.

विहित केलेल्या अटींपैकी उरलेल्या खालील अटी व शर्तीच्या अधिन राहून उपरोक्त नमूद केलेले अभ्यासक्रम सन २००३-२००४ पासून विना अनुदान तत्वावर सुरु करण्यास व विद्यार्थ्यांस प्रवेश देण्यास या संचालनालयाकडून अंतिम परवानगी देण्यांत येत आहे.

१. सदर मंजूरी कायम विना अनुदान तत्वावर राहील.

२. शासन निर्णय शिक्षण व सेवायोजन विभाग क्रमांक टिईएम-३३८२/१११८३६/(१९०)/तांशि-१अ, दिनांक २१ मे १९८३ अन्वये विना अनुदान तंत्रशिक्षण संस्थांना शासनाने विहित केलेल्या अटी व शर्ती आपणांस बंधनकारक असतील.

३. संस्थेने अभ्यासक्रम चालविण्यास पूर्णवेळ शिक्षकवृंद व इतर तांत्रिक कर्मचारी नेमावे व शासन व अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद यांच्या नियमाप्रमाणे वेतन व भत्ते कर्मचा-यांना देण्यांत यावे. शिक्षकवृंद व इतर कर्मचा-यांच्या वेतन व भत्ते इत्यादीबाबत तसेच विद्यार्थ्यांकडून या संचालनालयाकडे तक्रारी आल्यास संस्थेवर कडक कारवाई करण्यात येईल.

४. संस्थेने औषधनिर्माणशास्त्र पदविका अभ्यासक्रमासाठी नियतठेव म्हणून रु.५.०० लाख भारतीय स्टेट बँक शाखा चिंचवड येथे पावती क्रमांक एसडी/ए-४९ ८३९५९४ अन्वये ५ वर्षासाठी जमा केलेले आहेत.

५. आपल्या संस्थेला महाराष्ट्र शासन, तंत्रशिक्षण संचालनालय महाराष्ट्र राज्य, मुंबई व सचिव, महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई यांचेकडून वेळोवेळी विहित करण्यांत आलेले प्रवेश नियम, आरक्षण, शिक्षणशुल्क व इतर शुल्क या संबंधीच्या निर्णयाचे पालन करणे बंधनकारक राहील.

६. सदर अभ्यासक्रमाचे शिक्षण शुल्क शासन मंजूरीप्रमाणे आकारण्यात यावे.

७. संस्थेतील ग्रंथालयास आवश्यक ती पुस्तके, नियतकालिके इ. सचिव, महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई यांच्या मानकानुसार खरेदी करणे आवश्यक आहे. तसेच विद्यार्थ्यांना वाचनालयाचा पुरेपूर उपयोग होण्याचे दृष्टीने ग्रंथालयात विद्यार्थ्यांना अभ्यासिकेची सोय करणे आवश्यक आहे.

८. या संचालनालयाने किंवा सचिव, महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई किंवा त्यांच्याकडून प्राधिकृत करण्यांत आलेले अधिकारी यांस त्यांनी संस्थेचे निरिक्षण करुन त्या निरीक्षणांती संस्थेस आढळून येणा-या उणीवांबद्दल उचित कार्यवाही करण्याचे अधिकार राहतील.

९. सदर संस्था संचालक, तंत्रशिक्षण यांच्या नियंत्रणाखाली राहिल व संबंधित अभ्यासक्रमांच्या परीक्षा सचिव, महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई यांच्याकडून घेतल्या जातील.

१०. संस्थेला सचिव, महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई यांची सदर अभ्यासक्रमासाठी संलग्नता घ्यावी लागेल.

११. विद्यार्थ्यांना प्रवेश देतांना त्यांच्याकडून रकमेच्या स्वरुपात कॅपिटेशन फि किंवा इतर कोणत्याही स्वरुपात देणगी स्विकारता येणार नाही तसेच प्रवेश गुणवत्तेनुसार करणे बंधनकारक आहे.

१२. शासनाने, या संचालनालयाने व सचिव, महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ यांनी वेळोवेळी ठरवून दिलेल्या अटी व शर्तींचे संस्था उल्लंघन करीत असल्यास सदरची संस्था बंद करण्याचे अधिकार शासनास राहतील.

१३. संस्थेला फार्मसी कौंसिल ऑफ इंडिया यांची मान्यता घेणे आवश्यक राहील. तसेच फार्मसी कौंसिल आफ इंडिया यांनी संस्थेस मान्यता नाकारल्यास संस्था बंद करावी लागेल.

**उपरोक्त सर्व अटी व शर्ती आपणांस बंधनकारक राहतील.**

**( प्रा. न. बा. पासलकर )**
**संचालक**
**तंत्रशिक्षण महाराष्ट्र राज्य, मुंबई.**

प्रतः

१. मा. प्रधान सचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२ यांना संदर्भाधीन शासन निर्णयाच्या संदर्भात माहितीसाठी सादर.
२. सचिव,महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई यांना माहिती व योग्य कार्यवाहीसाठी.
३. उपसचिव, महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, पुणे.
४. सहसंचालक, तंत्रशिक्षण, विभागीय कार्यालय, पुणे यांना माहितीस्तव सादर.
५. श्री.अे.एम.जाधव, सिस्टिम ॲनालिस्ट यांना माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी.
६. कार्यासन क्रमांक १० मुख्य कार्यालय,मुंबई.
७. निवड नस्ती.

MSBTE मान्यता
2005-06


# तंत्र शिक्षण, विभागीय कार्यालय, पुणे

४१२, ई, शिवाजीनगर, पुणे - ४११ ०१६.

☎ २५६५ ६२३४, फॅक्स – (०२०)२५६५ ६२३४ Email .. jdtepu@pn3.vsnl.net.in


जा.क्र.विकापु/विवि-३/मुदतवाढ/पदविका/२००५/२११

दिनांक : ०७-०१-२००६
- 7 JAN 2006

प्रति,

सर्व विनाअनुदानित तंत्रनिकेतने,
(अभियांत्रिकी/औषधनिर्माणशास्त्र/हॉटेल मॅनेजमेंट ॲन्ड केटरींग टेक्नॉलॉजी/वास्तुशास्त्र पदविका अभ्यासक्रम व तत्सम संस्था )

विषय :- शैक्षणिक वर्ष २००६-०७ करिता (अभियांत्रिकी/औषधनिर्माणशास्त्र/हॉटेल मॅनेजमेंट ॲन्ड केटरींग टेक्नॉलॉजी/वास्तुशास्त्र) पदविका अभ्यासक्रम सुरु ठेवण्यांस मान्यता देण्याबाबत.

संदर्भ :- १०/एनजीपी/पदविका/२००५/३ दिनांक ०३/०१/२००६

उपरोक्त विषयासंदर्भात कळविण्यांत येते की, अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने पदविका संस्थांना शैक्षणिक वर्ष २००५-०६ पर्यंत मुदतवाढ दिलेली आहे. सदर पदविका संस्थांना शैक्षणिक वर्ष २००६-०७ मध्ये मुदतवाढ मिळण्यासाठी सर्व विनाअनुदानित संस्थांनी त्याचेकडे सुरु असलेल्या अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेने मान्यता दिलेल्या (अभियांत्रिकी/औधधनिर्माणशास्त्र/हॉटेल मॅनेजमेंट ॲन्ड केटरींग टेक्नॉलॉजी/वास्तुशास्त्र व तत्सम संस्था) पदविका अभ्यासक्रमांची माहिती प्रोगेस प्रोफाईलमध्ये भरुन या विभागीय कार्यालयाकडे दिनांक २५/०१/२००६ पूर्वी द्विप्रतीमध्ये सादर करावी. सदर प्रोग्रेस प्रोफाईलचा नमुना या संचालनालयाच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. (http:www.dte.org.in/download/Diploma_Progress_Profile_2006-07.doc)

तरी सर्व विना अनुदानित संस्थांनी मुदतवाढीसाठी **मा. सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे यांचे नावे तपासणी शुल्काचा रु.१५०००/-**चा धनादेश सोबत जोडून प्रोग्रेस प्रोफाईल सादर करावे.

(signature) 6/1/06

सहसंचालकांकरीता,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे.

Shri Fattechand Jain College of Pharmacy
Chinc...
Inward No. 161 Date - 12/1/2006.
Signature ...

# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

3, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक 1967, मुंबई 400 001.
दूरध्वनी – 22620601, 22690602, 22641150/51, फॅक्स – 22692102.
E-mail : diplomadesk10dte@gmail.com Internet : www.dtemaharashtra.gov.in


आदेश

क्रमांक : 10/एनजीपी/पदविका/नाव बदल/2015/ ४८२
दिनांक : - 3 JUN 2015

**विषय :- अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेच्या मान्यतेनुसार राज्यातील पदविका स्तरावरील संस्थांच्या नावात बदल करण्यास मान्यता देण्याबाबत...**
**संदर्भ :- शासन निर्णय क्र. मान्यता-2015/(67/15)/तांशि-5, दि. 25.5.2015.**

उपरोक्त विषयाबाबत कळविण्यात येते की, खालील तक्त्यात नमूद केलेल्या संस्थांना शैक्षणिक वर्ष 2015-16 पासून संस्थेच्या नावात बदल करण्याबाबत अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद, नवी दिल्ली यांनी दिलेल्या मान्यतेच्या अनुषंगाने संदर्भाधीन शासन निर्णयान्वये खाली नमूद केल्या प्रमाणे पदविका अभ्यासक्रमाच्या तंत्रनिकेतनाच्या नावात बदल करण्यास मान्यता दिलेली आहे.

| Sr. No. | DTE Code | Old Name of the Polytechnic | Sanctioned New Name of the Polytechnic. |
|---|---|---|---|
| 1. | 3276 | Mahatma Education Society's Pillai's Polytechnic, at Dr. K.M. Vasudevan Pillai Campus, Sector 16, New Panvel-410206. | Mahatma Education Society's **Pillai Polytechnic,** at Dr. K.M. Vasudevan Pillai Campus, Sector 16, New Panvel-410206. |
| 2. | 3283 | Mahatma Education Society's, Pillai's HOC Polytechnic, at Pillai HOCL Educational Campus, Rasayani, Tal. Khalapur, Raigad-410207. | Mahatma Education Society's. **Pillai HOC Polytechnic,** at Pillai HOCL Educational Campus, Rasayani, Tal. Khalapur, Raigad-410207. |
| 3. | 5222 | Sanjivani Rural Education Society's, S.E.T.'s K.B.P. Polytechnic, Shajanandnagar, Post Shingnapur, Tal Koparagaon, Dist Ahmednagar-423603. | Sanjivani Rural Education Society's, **Sanjivani K.B.P. Polytechnic**, Shajanandnagar, Post Shingnapur. Tal Koparagaon, Dist Ahmednagar-423603. |
| 4. | 5364 | MHFs College of Polytechnic, Hahnemann Hills, Chandanapuri Ghat, Gunjalwadipathar, Tal. Sangamner, Dist. Ahmednagar-422620. | MHFs **Dr. R.S. Gunjal Polytechnic,** Hahnemann Hills, Chandanapuri Ghat, Gunjalwadipathar, Tal. Sangamner, Dist. Ahmednagar-422620. |
| 5. | 6406 | Rayat Shikshan Sanstha's Karmaveer Bhaurao Patil College of Engineering and Polytechnic, at Satara, Gat. No. 242/B/1, Panmalewadi, Post Varye, Satara-415015. | Rayat Shikshan Sanstha's **Karmaveer Bhaurao Patil Polytechnic,** at Satara, Gat. No. 242/B/1, Panmalewadi. Post Varye, Satara-415015. |
| 6. | 6418 | Jaihind Comprehensive Educational Institute's Institute of Technology, at Kuran, Tal. Junnar, Pune-410511. | Jaihind Comprehensive Educational Institute's Jaihind Polytechnic, at Kuran, Tal. Junnar, Pune-410511. |
| 7. | 6423 | Shir Jain Vidya Prasarak Mandal's. Shri Jain Vidya Prasark Mandal Polytechnic, Fattechand Marg, Chinchwadgaon, Pune-411033. | Shir Jain Vidya Prasarak Mandal's. **Rasiklal M. Dhariwal Institute of Technology,** Fattechand Marg, Chinchwadgaon, Pune-411033. |

| Sr. No. | DTE Code | Old Name of the Polytechnic | Sanctioned New Name of the Polytechnic. |
|---|---|---|---|
| 8. | 6441 | Dr. D.Y. Patil Educational Academy's, Dr. D.Y. Patil Polytechnic, at Sr.No. 124 & 126, A/p-Ambi, MIDC Road, Talegaon Dabhade, Pune-410506. | Dr. D.Y. Patil Educational Academy's, **D.Y. Patil Polytechnic**, at Sr.No. 124 & 126, A/p-Ambi, MIDC Road, Talegaon Dabhade, Pune-410506. |
| 9. | 6482 | Shri. Balasaheb Mane Shikshan Prasarak Mandal Ambap's, College of Pharmacy,(D. Pharm.), at Peth Vadgaon, Tal-Hatakanangale, Dist. Kolhapur-416112. | Shri. Balasaheb Mane Shikshan Prasarak Mandal Ambap's, **Ashokrao Mane Institute of Diploma in Pharmacy**, at Peth Vadgaon, Tal-Hatakanangale, Dist. Kolhapur-416112. |
| 10. | 6499 | Shri Jain Vidya Prasarak Mandal's, Shri Fattechand Jain College of Pharmacy (D. Pharm.), D-II, 61/62, Acharya Anand Rushiji Marg, Telco Road, Chinchwad, Pune-411019. | Shri Jain Vidya Prasarak Mandal's, **Rasiklal M. Dhariwal College of Pharmacy**, D-II, 61/62, Acharya Anand Rushiji Marg, Telco Road, Chinchwad, Pune-411019. |
| 11 | 6526 | Maharashtra Academy of Engineering and Educational Research, Pune, Sri Savitribai Phule Polytechnic, at S.No. 124, M.I.T. Campus, Paud Road, Ex-Servicemen Colony, Pune-411038.(First Shift & Second Shift) | Maharashtra Academy of Engineering and Educational Research, Pune, **MIT Polytechnic**, at S.No. 124, M.I.T. Campus, Paud Road, Ex-Servicemen Colony, Pune-411038.(First Shift & Second Shift) |

शासनाने संदर्भाधीन शासन निर्णयान्वये उपरोक्त तंत्रनिकेतनाच्या नावामध्ये वरील प्रमाणे बदलास मान्यता दिलेली असल्याने तंत्रनिकेतनांच्या नावात वरील प्रमाणे बदल करण्यास या संचालनालयामार्फत मान्यता देण्यात येत आहे.

(डॉ. सुभाष महाजन)
संचालक,
तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

प्रत माहिती व आवश्यक कार्यवाहीसाठी सादर:-

१. मा. प्रधान सचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई.
२. संचालक, महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, बांद्रा, मुंबई यांना माहिती व कार्यवाहीसाठी.
३. सहसंचालक, तंत्रशिक्षण, विभागीय कार्यालय, मुंबई / नाशिक/ पुणे.
४. उपसचिव, महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, विभागीय कार्यालय,मुंबई / औरंगाबाद / पुणे.
५. प्रणाली व्यवस्थापक, का.क्र. 3, मुख्य कार्यालय, मुंबई यांना माहिती व कार्यवाहीसाठी.
६. संबंधीत संस्था.
७. निवड नस्ती.